18 NOV 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तिरंगी रोषणाईने विद्यापीठाची इमारत झळाळली...



कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठाच्या ६४व्या वर्धापनदिनाच्या पूर्वसंध्येला मुख्य प्रशासकीय भवन इमारतीला राष्ट्रध्वजाच्या रंगांची आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ इमारतीला रोषणाई



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या वर्धापनदिनाच्या पूर्वसंध्येला शुक्रवारी मुख्य प्रशासकीय भवन इमारतीला राष्ट्रध्वजाच्या रंगांची आकर्षक रोषणाई करण्यात आली.

1 8 NOV 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा वर्धापन दिन आज शनिवारी साजरा होतो आहे. या निमित्ताने मुख्य प्रशासकीय इमारतीला राष्ट्रध्वजाच्या रंगांची आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

18 NOV 2023
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा आज ६१ वा वर्धापन दिन

## विविध पुरस्कारांची घोषणा : डॉ. रवींद्र कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा वर्धापन दिन उद्या, शनिवारी सकाळी साडेआठ वाजता साजरा करण्यात येणार आहे. या समारंभासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. रवींद्र कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के असणार आहेत.

सकाळी साडेआठ वाजता ध्वजवंदन होईल. त्यानंतर राजर्षी शाहू सभागृहात विविध पुरस्कारांचे वितरण होणार आहे. त्यामध्ये समाजशास्त्र विभागातील प्रा. जगन कराडे (विद्यापीठ अधिविभागातंर्गत गुणवंत शिक्षक पुरस्कार), पीजीबीयुटीआर विभागातील अधीक्षक विजय माजगावकर, मध्यवर्ती मूल्यमापन विभागातील सहायक अधीक्षक नंदिनी पाटील, ग्रंथालय मदतनीस सतीश केसरकर, सभा व निवडणूक विभागातील हवालदार सदानंद सुभेदार (गुणवंत सेवक पुरस्कार), देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस् अँड सायन्स कॉलेज चिखली येथील प्राचार्य सर्जेराव रघुनाथ पाटील (महाविद्यालयीन गुणवंत प्राचार्य पुरस्कार), कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च वरे सातारा येथील प्रा. डॉ. सारंग भोळा (महाविद्यालयीन गुणवंत शिक्षक पुरस्कार), इस्लामपूर येथील श्री राजाराम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी राजारामनगर येथील मुख्य लिपिक सागर पाटील (महाविद्यालयीन गुणवंत सेवक पुरस्कार), डॉ. विनोद शिंपले (बॅरिस्टर पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार), प्राणीशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट (उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार) यांना सन्मानित केले जाणार आहे.

दरम्यान, या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाची विद्यापीठात आज दिवसभर तयारी सुरू होती. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.



कोल्हापूर : दक्षिण महाराष्ट्राचे ज्ञानकेंद्र असलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या ६१ वा वर्धापन दिन आज साजरा होत आहे. त्यानिमित्त विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

18 NOV 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ राज्याला दिशादर्शक

संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

## दक्षिण महाराष्ट्राच्या ज्ञानकेंद्राचा आज वर्धापन दिन | विविध अभिनव योजना, उपक्रमांतून वाटचाल



कोल्हापूर, ता. १७ : दक्षिण महाराष्ट्राचे ज्ञानकेंद्र असलेले शिवाजी विद्यापीठ उद्या (ता. १८) ६१ वा वर्धापन दिन साजरा करीत आहे. स्थापनेची ६० वर्षे पूर्ण करणाऱ्या या विद्यापीठाची देशातील उच्च शिक्षण, संशोधन क्षेत्रातील ओळख अधिक ठळक करण्याच्या दिशेने पाऊल पडत आहेत. परीक्षा पद्धतीत सुधारणा, अग्रणी महाविद्यालय योजना, महाविद्यालयांचे ॲकॅडमिक ऑडिट, प्रत्येक विद्यार्थिनीला वसतिगृह प्रवेश अशा अभिनव योजना, उपक्रम राबवित या विद्यापीठाची सुरू असलेली वाटचाल राज्यातील अन्य विद्यापीठ, शैक्षणिक संस्थांना दिशादर्शक ठरत आहे.

### परीक्षा पद्धतीत सुधारणा

विद्यापीठाच्या परीक्षा पद्धतीमध्ये अनेक सुधारणा करण्यात येत असून विद्यार्थी सुविधा केंद्रातर्फे विद्यार्थ्यांना दुबार गुणपत्रिका पूर्णपणे ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे दिले जाते. नवीन शैक्षणिक धोरणानुसार २०२२-२३ मधील प्रथम वर्ष प्रवेशित एकूण ६७,५९८ विद्यार्थ्यांपैकी ६५,२२४ म्हणजे सुमारे ९६.४८ टक्के विद्यार्थ्यांनी ॲकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटमध्ये आयडी काढला आहे. प्रोव्हिजनल पदवी प्रमाणपत्रही ऑनलाईन उपलब्ध करून देण्याची सुविधा आहे.

### ॲकॅडेमिक ऑडिट

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयांचे ॲकॅडेमिक ऑडिट करण्यासाठी विद्यापीठाने स्वतःची स्वतंत्र प्रणाली विकसित केली आहे. अहवाल मागविण्यापासून ते विश्लेषण करण्यापर्यंत सर्व बाबी विद्यापीठाकडून ऑनलाईन स्वरुपात केल्या जातात. त्याचप्रमाणे स्थानिक पडताळणी समित्यांचे अर्ज, अहवाल आणि कामकाज बहुतांश ऑनलाईन केले आहे.

> शिवाजी विद्यापीठाची प्रशासकीय घडी पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी अत्यंत नियोजनपूर्वक बसविलेली आहे. आजचे विद्यापीठाचे प्रशासन हे एक टीम म्हणून काम करते. त्यात महाविद्यालयीन प्रशासकीय सेवक, प्राचार्यांचा मोठा सहभाग आहे. विविध अभिनव योजना, उपक्रमांना अधिकार मंडळांचे पाठबळ मिळते आणि त्या राबविणे शक्य होते. त्यामुळे विद्यापीठाची अशा योजना, उपक्रमांच्या माध्यमातून राज्यातील दिशादर्शक वाटचाल करत आहे. त्याचे श्रेय विद्यापीठाच्या सर्व घटकांना आहे.
>
> **- डॉ. दिगंबर शिर्के**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

### प्रत्येक विद्यार्थिनीला वसतिगृह प्रवेश

वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही, म्हणून एकही विद्यार्थिनी उच्चशिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी वसतिगृहाची मागणी करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थिनीस तेथे प्रवेश देण्याचे धोरण विद्यापीठाने स्वीकारले आहे. त्यामुळे विद्यार्थिनी वसतिगृहात विद्यार्थिनींची संख्या वाढली आहे. 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृह, 'अस्मिता संशोधक विद्यार्थिनींचे वसतिगृह' यासह आता लोकस्मृती वसतिगृह योजनेच्या माध्यमातून विद्यार्थिनी वसतिगृहांचा विस्तार करण्याचे नियोजन आहे.

### इतर उल्लेखनीय पावले

- विद्यापीठाने स्वतचे ऑनलाईन रिसिट आणि पेमेंट पोर्टल यशस्वीरित्या कार्यान्वित केले आहे. त्यामुळे सर्व आर्थिक व्यवहार ऑनलाईन झाले आहेत.
- परीक्षा विभागातील कामकाज सुरळीत व गतिमान पद्धतीने होण्यासाठी आयटी कक्षातर्फे स्टॅटिस्टिकल रिपोर्ट, एक्झॅमिनेशन रिपोर्ट डॅश बोर्ड, कॅप स्टेटस रिपोर्ट, ग्रिव्हन्स पोर्टल, प्रोव्हिजनल डिग्री-पासिंग सर्टिफिकेट, कॉन्व्होकेशन रजिस्ट्रेशन आदी संगणक प्रणाली निर्माण करून यशस्वीरित्या कार्यान्वित केल्या आहेत.
- विद्यापीठ आपल्या कॅम्पसवरील आणि संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसह त्यांचे पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्यासाठी कल्याण निधी योजना राबविते. या अंतर्गत २०२१-२२ मध्ये विद्यापीठाअंतर्गत अशा एकूण २५७ जणांना दोन कोटी ३४ लाख ७५ हजार रुपयांच्या कल्याण निधीचे वितरण करण्यात आले.
- अग्रणी महाविद्यालय योजना ही विद्यापीठाची अभिनव योजना आहे. जवळजवळ असणाऱ्या महाविद्यालयांचे समूह करून त्यातील एकाकडे त्यांचे नेतृत्व देऊन आणि विद्यापीठातर्फे काही प्रोत्साहनात्मक निधी प्रदान केला जातो. त्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक व उपयुक्त उपक्रम राबविले जातात.
- ३३ कोटी लिटर पाणीसाठा आणि जलस्वयंपूर्ण विद्यापीठ म्हणून देशभरात लौकिक मिळविला आहे.
- विद्यापीठ कॅम्पसवर १३ हजारांहून अधिक वृक्षलागवड आणि बॉटेनिकल गार्डनमध्ये दुर्मिळ रोपांचे संवर्धन, पुष्पसंवर्धन केले आहे.

पुढारी



कोल्हापूर : ६१ व्या वर्धापन दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला विद्युत रोषणाईने सजवण्यात आले आहे. (छाया : नाज ट्रेनर)

# शिवाजी विद्यापीठाचा आज ६१ वा वर्धापन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा वर्धापनदिन शनिवार, दि. १८ नोव्हेंबर रोजी सकाळी साडे आठ वाजता साजरा करण्यात येणार आहे. यावेळी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

यावेळी विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक संलग्न महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य, शिक्षक व प्रशासकीय सेवक विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांची शैक्षणिक गुणवत्ता संपादन केलेले विद्यार्थी तसेच बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्या सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा गौरव करण्यात येणार आहे. प्रशासकीय गुणवत्ता अभियान पुरस्काराचे वितरण राजर्षी शाहू सभागृह येथे करण्यात येणार आहे.

समारंभाचे अध्यक्षस्थान शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरू हे भूषविणार आहेत. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित राहणार आहेत.

या समारंभास उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचे पुरस्कार जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. दि. १८ रोजी साजरा होत आहे. २०२३ मध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विभागामधून प्राणीशास्त्र विभागाला उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार जाहीर झाला आहे. उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलमपेंट या विभागाला जाहीर झाला आहे.

गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रा. जगन कराडे यांना जाहीर झाला आहे. गुणवंत सेवक पुरस्कार वित्त व लेखा विभागातील सहायक कुलसचिव सुरेश बंडगर, अधीक्षक विजय माजगावकर, सहायक अधीक्षक नंदिनी दिगंबर पाटील, ग्रंथालय मदतनीस सतीश केसरकर आदींना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

## १८ डिसेंबर रोजी दीक्षांत समारंभ

शिवाजी विद्यापीठाचा साठावा दीक्षांत समारंभ दि. १८ डिसेंबर रोजी होत आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सचिव प्रा. डॉ. अभय करंदीकर उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थान राज्यपाल रमेश बैस भूषवणार आहेत. प्रा. करंदीकर देशाच्या दूरसंचार क्षेत्रातील अतुलनीय योगदानासाठी ओळखले जातात. त्यांच्या संशोधनामुळे ५ जी आणि ग्रामीण ब्रॉडबँडच्या विस्ताराचा समावेश आहे.

लोकमत

# प्राणिशास्त्र विभागाला उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. विद्यापीठाचा ६१ वा वर्धापन दिन आज शनिवारी होणार आहे. २०२३ मध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विभागामधून प्राणिशास्त्र विभागाला उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार जाहीर झाला. अन्य विभागांतर्गत उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट या विभागाला जाहीर झाला.

गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रा. जगन कराडे, गुणवंत सेवक पुरस्कार सहायक कुलसचिव सुरेश बंडगर, अधीक्षक विजय माजगावकर, मध्यवर्ती मूल्यमापन विभागातील सहायक अधीक्षक नंदिनी दिंगबर पाटील, ग्रंथालय मदतनीस सतीश केसरकर, सभा व निवडणूक विभागातील हवालदार सदानंद सुभेदार यांना जाहीर झाला.

18 NOV 2023
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा अहवाल : यंदाही ध्वनिप्रदूषण वाढलेच

# दिवाळीच्या आतषबाजीने शहरात गाठली उच्चांकी ध्वनिपातळी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : दिवाळीत कोल्हापूर शहरातील ध्वनिपातळीत यंदाही आवाज वाढलेलाच राहिला. ध्वनिप्रदूषणाने कमालीची उंची गाठल्याचा अहवाल शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने दिला आहे. यंदा गणेश विसर्जन मिरवणुकीतही दरवर्षीपेक्षा ध्वनिप्रदूषणाची पातळी अधिकच होती. पाठोपाठ दिवाळीतील, तसेच क्रिकेट सामन्यानंतरच्या फटाक्यांच्या आतषबाजीमुळे वाढलेल्या ध्वनिपातळीत भर पडल्याने कोल्हापूरकरांना प्रदूषणाचा हा धोक्याचा इशारा मिळालेला आहे.

दिवाळीत कोल्हापूर शहरातील चार क्षेत्रांमधील २२ ठिकाणांचे शास्त्रीय मॉनिटरिंग इन्स्ट्रूमेंटचा वापर करून ध्वनिमापन सर्वेक्षण केले असता शहरात सर्वच ठिकाणी मोजलेला आवाज हा ध्वनिप्रदूषण कायदा २००० च्या मानांकनानुसार जास्त आढळून आला आहे. लक्ष्मीपूजन (१२ नोव्हेंबर), दिवाळी पाडवा (१४ नोव्हेंबर) आणि भाऊबीज (१५ नोव्हेंबर) यादरम्यान हे सर्वेक्षण केले होते. हा अहवाल विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. पी. डी. राऊत, अधिव्याख्याता प्रा. डॉ. आसावरी जाधव आणि प्रा. चेतन भोसले यांच्यासह सूरज चावरे आणि अमन मुजावर या एमएस्सीच्या विद्यार्थ्यांनी तयार केला आहे.

### १) शांतता क्षेत्र

| सर्वेक्षणाची जागा | लक्ष्मीपूजन | दिवाळी पाडवा | भाऊबीज |
|---|---|---|---|
| सीपीआर | ६७.२ | ६३.१ | ६३.३ |
| जिल्हाधिकारी कार्यालय | ५५.८ | ५१.३ | ६०.२ |
| जिल्हा न्यायालय | ६५.३ | ६५.० | ७१.२ |
| शिवाजी विद्यापीठ | ६०.५ | ५१.१ | ४१.८ |

### २) रहिवासी क्षेत्र

| | | | |
|---|---|---|---|
| शिवाजी पेठ | ८८.२ | ७५.२ | ७४.१ |
| मंगळवार पेठ | ८३.१ | ७२.४ | ७६.० |
| उत्तरेश्वर पेठ | ८१.१ | ७२.४ | ६८.४ |
| राजारामपुरी | ६५.६ | ६५.८ | ६६.८ |
| नागाळा पार्क | ६०.१ | ६०.१ | ६४.१ |
| ताराबाई पार्क | ६६.० | ६७.१ | ६४.१ |

### ३) व्यापारी क्षेत्र

| | | | |
|---|---|---|---|
| लक्ष्मीपुरी | ६६.० | ६६.५ | ६६.६ |
| बिंदू चौक | ७१.४ | ७८.३ | ७५.२ |
| मिरजकर तिकटी | ८०.३ | ७६.७ | ७५.७ |
| बिनखांबी गणेश मंदिर | ७६.० | ७८.८ | ७८.८ |
| महाद्वार रोड | ७५.२ | ७६.७ | ७१.४ |
| गुजरी कॉर्नर | ११०.२ | ७१.५ | ८१.१ |
| पापाची तिकटी | ७२.२ | ७०.३ | ७७.१ |
| गंगावेश | ८४.५ | ७५.४ | ७६.१ |
| शाहुपूरी | ६७.१ | ६६.१ | ६८.४ |
| राजारामपुरी | ७४.८ | ७६.७ | ७१.७ |

### ४) औद्योगिक क्षेत्र

| सर्वेक्षणाची जागा | लक्ष्मीपूजन | दिवाळी पाडवा | भाऊबीज |
|---|---|---|---|
| वायपी पोवार नगर | ७५.६ | ५८.५ | ६६.६ |
| उद्यमनगर | ७६.७ | ६१.४ | ५१.१ |

### क्रिकेट सामन्यांनंतरच्या आतषबाजीने वाढला आवाज

१ यावर्षी विश्वचषक स्पर्धेदरम्यान कोल्हापूरकरांनी फटाके उडवून केलेली आतषबाजी, दाखवलेला उत्साहही ध्वनिपातळी वाढण्याला कारणीभूत आहे, असे निरीक्षण शिवाजी विद्यापीठाच्या या चमूने नोंदविले आहे.

२ भाऊबिजेच्या दिवशी भारताने जिंकलेल्या क्रिकेट सामन्यानंतरही रात्री उशिरापर्यंत फटाक्यांच्या आवाजाने भर टाकली आहे.

### हवेचे प्रदूषणही वाढता वाढता वाढे...

औद्योगिक क्षेत्रात दिवसा ७५, रात्री ७०, व्यावसायिक क्षेत्रात दिवसा ६५, रात्री ५५, निवासी क्षेत्रात दिवसा ५५, रात्री ४५ आणि शांतता क्षेत्रात दिवसा ५० आणि रात्री ४० असा निर्देशांक वाढता राहिला.

दिवाळीतच नव्हे तर सामान्य पातळीतही आवाजाचे आणि हवेचेही प्रदूषण वाढलेले आहे. न्यायालयाने केलेले कायदे आणि निर्देश लोकांनी धाब्यावर बसवले हेच यातून स्पष्ट होते. दिल्लीइतके नसले तरी कोल्हापूरची वाटचालही त्याच दिशेने होते आहे, ही धोक्याची घंटा वेळीच समजून घ्यावी.

-डॉ. पी. डी. राऊत, पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ.

18 NOV 2023

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरात दिवाळीतील ध्वनिप्रदूषण वाढतेच

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**कोल्हापूर :** कोल्हापूर शहरात दिवाळीमध्ये ध्वनी प्रदूषणात वाढ झाली आहे. शहरातील चार क्षेत्रांमध्ये ध्वनीमापन सर्वेक्षण केले असता ही बाब निदर्शनास आल्याचे शुक्रवारी सांगण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाने दिवाळीतील ध्वनी प्रदूषणाचे सर्वेक्षण केले. शहरातील शांतता, निवासी, वाणिज्य व औद्योगिक अशा ४ क्षेत्रांमधील २२ ठिकाणी पर्यावरण विभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव, डॉ. पी. डी. राऊत, प्रा. चेतन भोसले, पर्यावरण विभागाचे विद्यार्थी सुरत चावरे, अमन मुजावर यांनी हे ध्वनी मापन सर्वेक्षण केले. गेल्या काही वर्षांत दिवाळीतील आवाज वाढत चालला आहे. यावर्षी फटाके कमी प्रमाणात वाजवावेत, असे आवाहन करण्यात आले होते. तरीही यंदा दिवाळी आवाजाची पातळी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानांकनापेक्षाही अधिक वाढली आहे.

## विश्वचषकाची भर

सध्या देशभरात एकदिवशीय क्रिकेट विश्वचषक सामन्याचा ज्वर आहे. कोल्हापुरातही तो शिगेला पोहोचला आहे. भाऊबीज दिवशी भारताने उपांत्य फेरीमध्ये दक्षिण आफ्रिकेला हरवले. त्यानंतर रात्री उशिरापर्यंत फटाक्यांच्या आवाजाची ध्वनी प्रदूषणामध्ये भर पडत राहिली.

1 8 NOV 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यंदा फटाक्यांचा 'आवाज' वाढला


## विद्यापीठाचे सर्वेक्षण ; केंद्रीय मानांकनापेक्षा अधिक

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : हवेच्या बिघडलेल्या गुणवत्तेमुळे राज्यातील संवेदनशील १७ ठिकाणांमध्ये कोल्हापूर शहराचा समावेश झाला आहे. शहरातील प्रदूषणाची वाढती पातळी चिंतेचा विषय बनली आहे. अशा स्थितीत यावर्षी पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहन शासन, प्रशासनाने केले होते. तरीही शहरात फटाक्यांचा आवाज वाढला. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानांकनापेक्षा आवाजाची पातळी जास्त राहिल्याचे शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागाने केलेल्या सर्वेक्षणातून स्पष्ट झाले आहे.

पान ११ वर >>

| क्षेत्रनिहाय ध्वनिमर्यादा | | |
|---|---|---|
| क्षेत्र | दिवसा | रात्री |
| औद्योगिक | ७५ | ७० |
| व्यावसायिक | ६५ | ५५ |
| निवासी | ५५ | ४५ |
| शांतता | ५० | ५० |



सकाळ

# यंदा फटाक्यांचा 'आवाज' वाढला

> पान १ वरून

कोल्हापूर शहरातील शांतता, निवासी, व्यावसायिक, औद्योगिक या क्षेत्रामधील २२ ठिकाणांचे ध्वनी मापन सर्वेक्षण पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी लक्ष्मीपूजन (ता. १२), पाडवा (ता. १४) आणि भाऊबीज (ता. १५) यादिवशी केले. त्यामध्ये गेल्यावर्षीप्रमाणे यंदाही आवाजाची पातळी वाढलेली दिसून आली. शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, उत्तरेश्वर पेठ, मिरजकर तिकटी, गुजरी कॉर्नर, गंगावेश परिसरात आवाजाची पातळी अधिक राहिली. पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, माजी विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक प्राध्यापक चेतन भोसले, एम. एस्सी. अभ्यासक्रमाचे विद्यार्थी सूरज चावरे, अमन मुजावर यांनी सर्वेक्षण केले.

### क्रिकेट सामना जिंकल्यानंतर आवाजात भर

शहरातील सर्व ठिकाणी यावर्षी आवाजाची पातळी अधिक राहिली. भाऊबीजेदिवशी भारताने विश्वचषकातील क्रिकेट सामना जिंकल्यानंतर रात्री उशिरापर्यंत फटाके वाजत राहिले. त्याने आवाजाच्या वाढणाऱ्या पातळीत भर टाकल्याचे निरीक्षण सर्वेक्षणात नोंदविण्यात आल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले.

**ध्वनिमापन असे... (डेसिबलमध्ये)**

| शांतता क्षेत्र | लक्ष्मीपूजन | पाडवा | भाऊबीज |
|---|---|---|---|
| सीपीआर रुग्णालय | ६७.२ | ६३.९ | ६३.३ |
| जिल्हाधिकारी कार्यालय | ५५.८ | ५९.३ | ६०.२ |
| न्यायालय | ६५.३ | ६५.० | ७१.२ |
| शिवाजी विद्यापीठ | ६०.५ | ५१.१ | ४९.८ |
| **व्यावसायिक क्षेत्र** | | | |
| लक्ष्मीपुरी | ६६.० | ६६.५ | ६६.६ |
| बिंदू चौक | ७९.४ | ७८.३ | ७५.२ |
| मिरजकर तिकटी | ८०.३ | ७६.७ | ७५.७ |
| बिनखांबी गणेश मंदिर | ७६.० | ७८.८ | ७८.८ |
| महाद्वाररोड | ७५.२ | ७६.७ | ७९.४ |
| गुजरी कॉर्नर | ११०.२ | ७९.५ | ८१.१ |
| पापाची तिकटी | ७२.२ | ७०.३ | ७७.९ |
| गंगावेश | ८४.५ | ७५.४ | ७६.१ |
| शाहूपुरी | ६७.९ | ६६.१ | ६८.४ |
| राजारामपुरी | ७४.८ | ७६.४ | ७१.७ |
| **औद्योगिक क्षेत्र** | | | |
| वाय. पी. पोवारनगर | ७५.६ | ५८.५ | ६६.६ |
| शिवाजी उद्यमनगर | ७६.७ | ६१.४ | ५९.१ |